# प्रकरण ६ वे

# * बखर गदय *

बखर हा शब्द फारशी भाषेतील खबर या शब्दात बदल होऊन तयार झालेला आहे.

प्रेरणा :—

एखादया परिसरातील घडामोडी संबंधिचा वृतांत लिहून ठेवला जात असे. याला 'तवारिखा' असे म्हणतात. अशा प्रकारे इस्लामी राजवटीत मराठी साहित्यात ही पद्धत विकासली गेली. याचाच बखर असे म्हणतात.

## * बखरींचे प्रकार :—

① चरित्रात्मक बखरी – शिव प्रभुचे चरित्र, शिवछत्रपतींचे सत्ता प्रकरणात्मक चरित्र, संभाजी राजे यांचे चरित्र राजाराम यांचे चरित्र.

② चरित्रात्मक :— नाना फडणीसांचे चरित्र, रामशास्त्री पटवर्धन यांचे चरित्र

③ सांप्रदायिक बखरी :— वडगावकर स्वामींची बखर ब्रम्हेंद्र स्वामींची बखर

④ कुलवृत्तांत सांगणाऱ्या बखरी :— भटपेशव्यांची बखर

⑤ युद्ध प्रसंगावरील बखर :— साष्टीची बखर, पानिपतची बखर आणि भाऊसाहेबांची बखर.

अभ्यासक्रमासाठी

① सभासदाची बखर ② आज्ञापत्र ③ भाऊसाहेबांची बखर

# 1) सभासदांची बखर

② शिव छत्रपतींचे चरित्र

ही बखर कृष्णाजी अनंत सभासदांनी लिहिली आहे. त्यात शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले आहे. यामध्ये शिवाजीच्या वडिलांच्या काळापासून ते 1680 मध्ये झालेल्या मृत्युचे वर्णन आलेले आहे. या बखरीला वरील दोन्ही नावाने ओळखले जाते.

## बखरीचे विशेष

1) शिव छत्रपतींचे व्यक्तिमत्त्व :—

शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू पुढीलप्रमाणे. ते सर्वसामान्य माणसांना विश्वासात घेऊन वागत असत. पराक्रम व धाडसाप्रमाणेच ते डावपेची व मुत्सद्दी होते. त्यांनी लोकहिताची अनेक कामे केली. स्वराज्य निर्माण करून अष्टप्रधानांची नेमणूक केली. त्यांची आई वडिलांवर फार श्रद्धा होती. शहाजींच्या मृत्यूनंतर आईला सती जाऊ दिले नाही. ते शिव भक्त होते. धार्मिक वृत्तीचे होते. शिखर शिवपूजेस ते उत्साहाने उपस्थित असत. शिखर शिंगणापूरचे, शंभू महादेवाचे दैवत हे त्यांचे कुलदैवत होते. तसेच ते तुळजा भवानीचेही परम भक्त होते. अंत समयी गंगेच्या पाण्याने न्हाऊन अंगाला भस्म लावून शिव चिंतनामध्ये त्यांनी प्राण सोडले.

② सांस्कृतिक चित्रण :—

यामध्ये तत्कालिन समाजाचे सांस्कृतिक चित्रण आलेले आहे. जसे तुळजा देवीचे चित्रण, म्हशोत्या पर्वताचे परिसर, शिखर शिंगणापूरचा परिसर, छत्रपतींनी केलेले दानधर्म अशा कितीतरी नोंदी यामध्ये आहेत.

③ युद्धप्रसंगाचे वर्णन :—

अफजल खानाचा वध, शाहिस्ते खानाची बोटे तोडल्याचा प्रसंग, दिलेरखान व मावळे यांचे युद्ध सालेरीचे युद्ध

④ आनंद सोहळ्याचे वर्णन

भागानगरच्या कुतुबशहाने छत्रपतींचा मोठा स्वागत समारंभ केला त्याचे वर्णन, छत्रपतींच्या राज्यारोहणाचे वर्णन, छत्रपतींच्या मुंजीचे वर्णन, राज्याभिषेक अष्टप्रधानाची नेमणूक

⑤ दुःख प्रसंगाचे वर्णन :—

शहाजी राजांच्या मृत्यूचा प्रसंग, छत्रपतींच्या निधनाचा प्रसंग

⑥ बखरीची शैली :—

यामध्ये बखरकारांचे ओघवते चित्रण

Scanned with OKEN Scanner

असावे, आरमार बांधलेला लिहिल्या कोबडी लोकांना वाकलून देऊ नये. शत्रूशी सावधपणे लढावे. बुद्धि लागवड करावी असे विचार रामचंद्र- अमात्यांनी मांडले.

# * भाऊसाहेबांची बखर *

ही बखर युद्ध प्रसंगावर लिहिलेली आहे. ही पेशवेकालीन बखर म्हणून ओळखली जाते. ऐतिहासिक वाङ्मयीन दृष्टीने महत्त्वाची आहे. यामध्ये पानिपतच्या युद्धाचे वर्णन आलेले आहे. युद्ध वर्णनाने बखरीचा 2/3 भाग व्यापलेला आहे. पानिपतच्या युद्धापूर्वी युद्धापूर्वी मराठ्यांनी उत्तरेकडे केलेल्या राजकारणाचा सुरवातीचा 1/3 भाग आला आहे. इ.स. 1753 ते 1760 पर्यंत उत्तरेकडील घडामोडीचे चित्रण यामध्ये आला आहे.

* व्यक्तिचित्रण :-

यामध्ये प्रत्यक्ष सदाशिवराव भाऊंच्या लिखाण मात्रा गमणे या वाक्यावरून नजिबखानाचे व्यक्तिचित्रण आलेले आहे. तर तुम्ही नजिबखान यांचे परिपत्य कराल तर तुम्हास पेशवे घोडे उडवायास कानातील या सर्वातून मल्हारराव होळकरांची व्यक्तिरेखा गोचर होते. तसेच बचेंगे तो और भी लढेंगे या वाक्यावरून दत्ताजी शिंदे

यांचे बालमित्र कृत्याचे पराक्रमाचे गाजविण्याचे वृत्ती आपल्या लक्षात येते.

* स्त्रिव्यक्तिरेखा :–

दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर भागिरथीबाई यांनी जो शोक केले आहे. तसेच जनकोजींचे पराभव झाल्यानंतर मल्हाररावांची बायको गौतमीबाई यांनी मल्हार रावांची जी कानउघाडणी करते. यावरून गौतमी बाईची व्यक्तीरेखा प्रत्ययकारी बनते.

* वस्तु वर्णन :–

यामध्ये कुंजपुऱ्याच्या किल्ल्याचे वर्णन लक्षात घेण्यासारखे आहे. बखरकार म्हणतो तो दर्गा असाध्य मोर्चे चालवून सुरंग लावावे तर रान रेतीचे सुरंग लावता येत नाही. तोफांचे गोळे मारले तर गोळा रेतीत जातो, तसेच आग्र्याच्या किल्ल्याचेही वर्णन आलेले आहे. कुरुक्षेत्र आणि मुकुंदतीर्थ या दोन्ही ठिकाणाचे वर्णन पौराणिक पद्धतीने केले आहे.

* प्रसंग चित्रण :–

दत्ताजी शिंद्यांना पकडून कुतुबशहा पुढे नेल्यानंतर कुतुबशाहा विचारतो. "पटेल हमारे साथ तुम और लडेंगे" हे ऐकून दत्ताजी म्हणतात "बचेंगे तो और भी लडेंगे" त्यावेळी कुतुबशाहा दत्ताजीला लाथ मारतो. त्यांचे शिरच्छेद करण्यात येते. या प्रसंगाचे हृदयद्रावक चित्रण बखरकारांनी केलेले आहे. बळवंतरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या बायकोने केलेला शोक बखरकाराने ज्या शब्दातून केलेले आहे ते वाचतांना आपल्या मनाला पिळ पडते.

* वातावरण निर्मिती :–

पानिपतच्या लढाईनंतर लोकांची जी अवस्था झाली, लोक सैरा वैरा पळू लागले. कित्येकांचे कपडे काढून घेतल्यानंतर नग्न पळत होते अन्न नसतांना सैरा वैरा पळणाऱ्या यांना

लोकांचे चित्रण बखरकाराने उत्कृष्ट पद्धतीने केला आहे.

* स्वकियांचा गौरव परकियांचा तिरस्कार :-

या बखरीत बखरकाराने मराठ्यांच्या पराक्रमाचा गौरव केला आहे. तर इस्लामी पुरुषांचा अहमदशहा, अब्दाली नजीब शहा, रोहिल्यांचा तिरस्कार केला आहे.

* बखरीची भाषा शैली :-

ही भाषा शैली उर्दू, मराठी मिश्रित अशी असते. याचप्रमाणे संस्कृत गद्यातील सुभाषितांचाहि वापर बखरकाराने केलेला आहे.

उदा: "स्त्रिबुद्धि प्रलयंगत"

"नळाटे असावे पण थोलटे नसावे"

* प्रतिमा विचार :→

या बखरीतील वर्णनामध्ये अनेक प्रतिमांची योजना बखरकार करतो.

"जसे भडभुंजे लाह्या भाजतात मारामार केली"

"कुणी मारी बचडे दाणादाण"

"जसा डुक्कर खळीस येतो तैसे मारामार केली."